दै. सकाळ
१७ जुलै 2003

## भोगीशयन यांना आदरांजली

**कोल्हापूर, ता. १६ :** येथील ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयातर्फे शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू के. भोगीशयन यांना आदरांजली वाहण्यात आली. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्यासह शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

दै. पुढारी
१८ जुलै 2003

## कमला कॉलेजमध्ये प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम

**कोल्हापूर :** येथील कमला कॉलेजमध्ये लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने अर्थकारण, राजकारण, क्रीडा, साहित्य, इतिहास, संगणक, बँकींग या संदर्भातील प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम झाला. या उपक्रमात ६० विद्यार्थिनी सहभागी झाल्या. हा कार्यक्रम लोकसंख्या शिक्षण मंडळ व अर्थशास्त्र विभागातर्फे घेण्यात आला. प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. सौ. तेजस्वीनी मुडेकर यांनी केले. आभार नेताजी पोवार यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सौ. अनघा पाठक यांनी केले. डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

दै. पुढारी २४ जुलै 2003

## कमला कॉलेजमध्ये डॉ. निवेदिता फडके यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** कमला कॉलेजमध्ये माजी विद्यार्थिनी संघाच्या वतीने डॉ. निवेदिता फडके यांचे 'वैवाहिक समायोजन' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी डॉ. फडके यांनी वैवाहिक जीवनाच्या संदर्भातील समज व गैरसमज यांची विद्यार्थिनींना माहिती दिली. यावेळी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. कविता बागवे यांनी केले.

दै. सकाळ २७ जुलै 2003

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये जे. बी. पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रा. ए. एम. साळोखे यांनी संयोजन केले.

दै. तरुण भारत २८ जुलै 2003

**कमला कॉलेज**

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये प्रा. जे. बी. पाटील यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील होते. संयोजन प्रा. ए. एम. साळोखे यांनी केले. यावेळी शिक्षक, कर्मचारी